सत्यमेव जयते
महाराष्ट्रशासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:१०/एडीएम/प्रमाणपत्र/२०२१/ ५११ दिनांक: 6 JUL 2021

प्रति,
मा. उप विभागीय अधिकारी / तहसीलदार
महाराष्ट्र राज्यातील सर्व महसूल उपविभागीय कार्यालये/ तालुके.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे /प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, या संचालनालयामार्फत इयत्ता १०वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका, इयत्ता १२वी नंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी आणि सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार पार पाडली जाते.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया दि. ३०.०६.२०२१ पासून सुरू झाली आहे व अर्ज भरण्याची शेवटची तारीख दि. २३.०७.२०२१ आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की काही विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्र (डोमिसाईल प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र इ.) अद्याप प्राप्त झालेली नसल्यामुळे त्यांना प्रवेशासाठी अर्ज सादर करताना अडचणी निर्माण होत आहेत.

तरी, विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे / प्रमाणपत्र लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-
१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदविका प्रवेशासाठी नियुक्त केलेले नोडल अधिकारी (Nodal Officer) यांनी सदरील पत्र उपविभागीय अधिकारी / तहसीलदार यांच्या निदर्शनास आणून द्यावे व विद्यार्थ्यांना कागदपत्रे/ प्रमाणपत्र लवकर उपलब्ध करून देण्याची विनंती करावी.
३) प्राचार्य/संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था यांना माहितीस्तव.